श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## कपिल गीता अध्याय (3.29)



नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्

तृतीय स्कंधः

॥ अथ एकोनत्रिं(म्)शोऽध्यायः ॥

देवहूतिरुवाच

लक्षणं(म्) महदादीनां(म्), प्रकृतेः(फ्) पुरुषस्य च ।
स्वरूपं(लँ) लक्ष्यतेऽमीषां(यँ), येन तत्पारमार्थिकम् ॥ 1॥

यथा साङ्ख्येषु कथितं(यँ), यन्मूलं(न्) तत्प्रचक्षते ।
भक्तियोगस्य मे मार्गं(म्), ब्रूहि विस्तरशः(फ्) प्रभो ॥ 2॥

देवहूतीने विचारले - प्रभो ! प्रकृती, पुरुष आणि महत्तत्त्वादींचे जे लक्षण सांख्यशास्त्रात सांगितले आहे, तसेच ज्या शास्त्राने त्यांचे वास्तविक स्वरूप वेगवेगळे जाणले जाते आणि भक्तियोग हेच ज्याचे प्रयोजन सांगितले जाते ते शास्त्र आपण मला कथन केले. आता भक्तियोगाचा मार्ग मला विस्तारपूर्वक सांगावा. (१-२)

विरागो येन पुरुषो, भगवन् सर्वतो भवेत् ।

आचक्ष्व जीवलोकस्य, विविधा मम सं(म्)सृतीः ॥ 3॥

हे भगवन, याशिवाय जीवाच्या जन्म-मरणरूप अनेक प्रकारच्या गतींचे सुद्धा वर्णन करावे. जे ऐकल्यामुळे जीवाला सर्व प्रकारच्या वस्तूंविषयी वैराग्य निर्माण होते. (३)

कालस्येश्वररूपस्य, परेषां(ञ्) च परस्य ते ।

स्वरूपं(म्) बत कुर्वन्ति, यद्धेतोः(ख्) कुशलं(ञ्) जनाः ॥ 4॥

तसेच ज्याच्या भयामुळे लोक शुभकर्मांना प्रवृत्त होतात आणि जो ब्रह्मादिकांहूनही श्रेष्ठ आहे, त्या सर्वसमर्थ अशा काळाचे स्वरूपही आपण मला सांगावे. (४)

लोकस्य मिथ्याभिमतेरचक्षुषश्-

चिरं(म्) प्रसुप्तस्य तमस्यनाश्रये ।

श्रान्तस्य कर्मस्वनुविद्धया धिया,

त्वमाविरासीः(ख्) किल योगभास्करः ॥ 5॥

ज्ञानदृष्टी लुप्त झाल्यामुळे देहादी मिथ्या वस्तूंमध्ये ज्यांना आत्माभिमान झाला आहे, तसेच बुद्धी कर्मासक्त राहिल्याकारणाने अत्यंत श्रम घेऊनही जे पुष्कळ काळापासून अपार अंधकारमय अशा संसारात निद्रिस्त झाले आहेत, त्यांना जागविण्यासाठी आपण (जणू) योगप्रकाशक सूर्यच प्रगट झाला आहात. (५)

मैत्रेय उवाच

इति मातुर्वचः(श्) श्लक्ष्णं(म्), प्रतिनन्द्य महामुनिः ।

आबभाषे कुरुश्रेष्ठ, प्रीतस्तां(ङ्) करुणार्दितः ॥ 6॥

मैत्रेय म्हणतात - कुरुश्रेष्ठ विदुरा, मातेचे हे मनोहर वचन ऐकून महामुनी कपिलांनी तिची स्तुति केली आणि दयेने कळवळा येऊन अत्यंत प्रसन्नतेने ते तिला म्हणाले. (६)

श्रीभगवानुवाच

भक्तियोगो बहुविधो, मार्गैर्भामिनि भाव्यते ।

स्वभावगुणमार्गेण, पुं(म्)सां(म्) भावो विभिद्यते ॥ 7॥

श्रीभगवान म्हणाले - हे माते, साधकांच्या भावानुसार भक्तियोग अनेक प्रकारे प्रगट झाला आहे. कारण स्वभाव आणि गुणांच्या भेदामुळे मनुष्याच्या भावनांमध्ये भिन्नता असते. (७)

अभिसन्धाय यो हिं(म्)सां(न्), दम्भं(म्) मात्सर्यमेव वा ।

सं(म्)रम्भी भिन्नदृग्भावं(म्), मयि कुर्यात्स तामसः ॥ 8॥

प्राणी व ईश्वर यांच्यात भेद पाहणारा जो क्रोधी पुरुष हृदयात हिंसा, दंभ किंवा मत्सर असा भाव ठेवून माझ्यावर प्रेम करतो, तो माझा तामस भक्त होय. (८)

विषयानभिसन्धाय, यश ऐश्वर्यमेव वा ।

अर्चादावर्चयेद्यो मां(म्), पृथग्भावः(स्) स राजसः ॥ 9॥

जो पुरुष विषय, यश आणि ऐश्वर्य (मिळविण्याच्या) कामनेने प्रतिमा इत्यादींमध्ये भेदभाव बाळगून माझे पूजन करतो, तो राजस भक्त होय. (९)

कर्मनिर्हारमुद्दिश्य, परस्मिन् वा तदर्पणम् ।

यजेद्यष्टव्यमिति वा, पृथग्भावः(स्) स सात्त्विकः ॥ 10॥

जो मनुष्य पापांचा क्षय करण्यासाठी किंवा परमात्म्याला अर्पण करण्यासाठी पूजन करणे आपले कर्तव्य समजून भेदबुद्धीने माझे पूजन करतो, तो सात्त्विक भक्त होय. (१०)

मद्गुणश्रुतिमात्रेण, मयि सर्वगुहाशये ।

मनोगतिरविच्छिन्ना, यथा गङ्गाम्भसोऽम्बुधौ ॥ 11॥

लक्षणं(म्) भक्तियोगस्य, निर्गुणस्य ह्युदाहृतम् ।

अहैतुक्यव्यवहिता, या भक्तिः(फ्) पुरुषोत्तमे ॥ 12॥

ज्याप्रमाणे गंगेचा प्रवाह अखंडपणे समुद्राकडे वाहात जातो, त्याचप्रमाणे माझ्या गुणांच्या केवळ श्रवणाने ज्याच्या मनाची वृत्ती तेलाच्या धारेप्रमाणे अखंड सर्वांतर्यामी असणाऱ्या माझ्याकडे असते, तसेच पुरुषोत्तम अशा माझ्याबद्दल जे निष्काम आणि अनन्य प्रेम असते, ते निर्गुण भक्तियोगाचे लक्षण सांगितले गेले आहे. (११-१२)

सालोक्यसार्ष्टिसामीप्य-सारूप्यैकत्वमप्युत ।

दीयमानं(न्) न गृह्णन्ति, विना मत्सेवनं(ञ्) जनाः ॥ 13॥

असे निष्काम भक्त, मी देण्यास तयार असतानाही माझी सेवा सोडून सलोकता, सार्ष्टी, समीपता, सरूपता आणि सायुज्य मुक्तीसुद्धा घेत नाहीत. (१३)

स एव भक्तियोगाख्य, आत्यन्तिक उदाहृतः ।

येनातिव्रज्य त्रिगुणं(म्), मद्भावायोपपद्यते ॥ 14॥

हाच भक्तियोग परम पुरुषार्थ मानला गेला आहे. याच्या योगाने मनुष्य तिन्ही गुणांना ओलांडून माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो. (१४)

निषेवितेनानिमित्तेन, स्वधर्मेण महीयसा ।

क्रियायोगेन शस्तेन, नातिहिं(म्)स्रेण नित्यशः ॥ 15॥

मद्धिष्ण्यदर्शनस्पर्श-पूजास्तुत्यभिवन्दनैः ।

भूतेषु मद्भावनया, सत्त्वेनासङ्गमेन च ॥ 16॥

महतां(म्) बहुमानेन, दीनानामनुकम्पया ।

मैत्र्या चैवात्मतुल्येषु, यमेन नियमेन च ॥ 17॥

आध्यात्मिकानुश्रवणान्- नामसङ्कीर्तनाच्च मे ।

आर्जवेनार्यसङ्गेन, निरहङ्क्रियया तथा ॥ 18॥

मद्धर्मणो गुणैरेतैः(फ्), परिसं(म्)शुद्ध आशयः ।

पुरुषस्याञ्जसाभ्येति, श्रुतमात्रगुणं(म्) हि माम् ॥ 19॥

निष्काम भावाने श्रद्धापूर्वक आपल्या नित्यनैमित्तिक कर्तव्यांचे पालन करणे, नियमितपणे हिंसारहित उत्तम शास्त्रविहित उपासना करणे, माझ्या प्रतिमेचे दर्शन, चरणस्पर्श, पूजा, स्तुती आणि वंदन करणे, प्राण्यांच्यामध्ये माझी भावना करणे, धैर्य आणि वैराग्य धारण करणे, महापुरुषांना मान देणे, दीनांवर दया करणे आणि आपल्यासारखीच स्थिती असणाऱ्यांबरोबर मित्रत्वाने वागणे, यमनियमांचे पालन, अध्यात्मशास्त्रांचे श्रवण, नामसंकीर्तन, मनाची सरलता, सत्पुरुषांची संगती, अहंकाराचा त्याग याप्रकारे माझ्या भागवतधर्माचे अनुष्ठान करणाऱ्या भक्तांचे चित्त अत्यंत शुद्ध होऊन माझ्या गुणांच्या केवळ श्रवणाने अनायासे माझ्याकडे लागते. (१५-१९)

यथा वातरथो घ्राण-मावृङ्क्ते गन्ध आशयात् ।

एवं(यँ) योगरतं(ञ्) चेत, आत्मानमविकारि यत् ॥ 20॥

ज्याप्रमाणे वाऱ्याने उडून जाणारा वास आपला आश्रय असलेल्या फुलातून नाकापर्यंत पोहोचतो, त्याचप्रमाणे भक्तियोगात तत्पर आणि राग-द्वेषादी विकाररहित चित्त परमात्म्याकडेच ओढ घेते. (२०)

अहं(म्) सर्वेषु भूतेषु, भूतात्मावस्थितः(स्) सदा ।

तमवज्ञाय मां(म्) मर्त्यः(ख्), कुरुतेऽर्चाविडम्बनम् ॥ 21॥

मी आत्मरूपाने सर्व जीवांमध्ये राहातो. त्या मज परमात्म्याचा अनादर करून जे प्रतिमारूपातच माझी पूजा करतात, त्यांची ती पूजा म्हणजे केवळ देखावा होय. (२१)

यो मां(म्) सर्वेषु भूतेषु, सन्तमात्मानमीश्वरम् ।

हित्वार्चां(म्) भजते मौढ्याद्- भस्मन्येव जुहोति सः ॥ 22॥

सर्व भूतमात्रांमध्ये स्थित, सर्वांचा आत्मा, परमेश्वर अशा माझी मूर्खपणे उपेक्षा करून केवळ प्रतिमा-पूजनातच जो गढलेला असतो, तो जणू अग्नी सोडून भस्मामध्येच हवन करतो. (२२)

द्विषतः(फ्) परकाये मां(म्), मानिनो भिन्नदर्शिनः ।
भूतेषु बद्धवैरस्य, न मनः(श्)शान्तिमृच्छति ॥ 23॥

जो भेदबुद्धीने पाहणारा अहंकारी मनुष्य दुसऱ्या जीवांशी वैर करतो आणि अशा प्रकारे त्यांच्या शरीरात असणाऱ्या माझाच द्वेष करतो, त्याच्या मनाला कधीच शांती मिळत नाही. (२३)

अहमुच्चावचैर्द्रव्यैः(ख्), क्रिययोत्पन्नयानघे ।
नैव तुष्येऽर्चितोऽर्चायां(म्), भूतग्रामावमानिनः ॥ 24॥

हे माते, जो दुसऱ्या जीवांचा अपमान करतो आणि श्रेष्ठ-कनिष्ठ पदार्थांनी माझ्या मूर्तीचे पूजन करतो, त्याच्यावर मी प्रसन्न होत नाही. (२४)

अर्चादावर्चयेत्ताव-दीश्वरं(म्) मां(म्) स्वकर्मकृत् ।
यावन्न वेद स्वहृदि, सर्वभूतेष्ववस्थितम् ॥ 25॥

मनुष्याने आपल्या धर्माचे अनुष्ठान करीत तोपर्यंतच मज ईश्वराची प्रतिमा आदींमध्ये पूजा करीत राहावे, जोपर्यंत त्याला आपल्या हृदयात, तसेच संपूर्ण प्राण्यात स्थित असलेल्या परमात्म्याचा अनुभव येत नाही. (२५)

आत्मनश्च परस्यापि, यः(ख्) करोत्यन्तरोदरम् ।
तस्य भिन्नदृशो मृत्युः(र्), विदधे भयमुल्बणम् ॥ 26॥

जी व्यक्ती आत्मा आणि परमात्मा यांच्यामध्ये थोडे सुद्धा अंतर आहे असे समजते, त्या भेददर्शी व्यक्तीला मी मृत्युरूप मोठे भय उत्पन्न करतो. (२६)

अथ मां(म्) सर्वभूतेषु, भूतात्मानं(ङ्) कृतालयम् ।
अर्हयेद्दानमानाभ्यां(म्), मैत्र्याभिन्नेन चक्षुषा ॥ 27॥

म्हणून सर्व प्राण्यांमध्ये घर करून त्या प्राण्यांच्याच रूपात असलेल्या मज परमात्म्याचे यथायोग्य दान, मान, मैत्रीपूर्ण व्यवहार आणि समदृष्टी याद्वारे पूजन केले पाहिजे. (२७)

जीवाः(श्) श्रेष्ठा ह्यजीवानां(न्), ततः(फ्) प्राणभृतः(श्) शुभे ।
ततः(स्) सचित्ताः(फ्) प्रवरास्- ततश्चेन्द्रियवृत्तयः ॥ 28॥

तत्रापि स्पर्शवेदिभ्यः(फ्), प्रवरा रसवेदिनः ।
तेभ्यो गन्धविदः(श्) श्रेष्ठास्- ततः(श्) शब्दविदो वराः ॥ 29॥

हे माते, पाषाणादी अचेतनांपेक्षा वृक्षादी जीव श्रेष्ठ आहेत. त्यांच्यापेक्षा श्वास घेणारे प्राणी श्रेष्ठ आहेत. त्यातसुद्धा मन असणारे प्राणी उत्तम आणि त्यांच्याहीपेक्षा इंद्रियवृत्तींनी युक्त प्राणी श्रेष्ठ होत. इंद्रियवृत्तियुक्त प्राण्यांमध्ये सुद्धा केवळ स्पर्शाचा अनुभव करणाऱ्यांपेक्षा रसाचे ग्रहण करू शकणारे मासे वगैरे उत्कृष्ट आहेत. तसेच रसवेत्त्यांपेक्षा गंधाचा अनुभव घेणारे भ्रमर आदी आणि गंध ग्रहण करणाऱ्यांपेक्षासुद्धा शब्द ग्रहण करणारे श्रेष्ठ आहेत. (२८-२९)

रूपभेदविद्स्तत्र, ततश्चोभयतोदतः ।

तेषां(म्) बहुपदाः(श्) श्रेष्ठाश्- चतुष्पाद्स्ततो द्विपात् ॥ 30॥

त्यांच्याहीपेक्षा रूपाचा अनुभव घेणारे कावळे इत्यादी उत्तम आहेत. त्यांच्यापेक्षा ज्यांना तोंडामध्ये वर-खाली दोन्ही बाजूस दात असतात, ते जीव श्रेष्ठ आहेत. त्यांच्यामध्ये सुद्धा पाय नसणाऱ्यांपेक्षा पुष्कळ पाय असणारे श्रेष्ठ होत. तसेच पुष्कळ पाय असणाऱ्यांपेक्षा चार पाय असणारे आणि चार पाय असणाऱ्यांपेक्षासुद्धा दोन पाय असणारा मनुष्य श्रेष्ठ आहे. (३०)

ततो वर्णाश्च चत्वारस्- तेषां(म्) ब्राह्मण उत्तमः ।

ब्राह्मणेष्वपि वेदज्ञो, ह्यर्थज्ञोऽभ्यधिकस्ततः ॥ 31॥

मनुष्यांमध्ये सुद्धा चार वर्ण श्रेष्ठ आहेत. त्यांमध्ये सुद्धा ब्राह्मण श्रेष्ठ होत. ब्राह्मणांमध्येही वेद म्हणणारा उत्तम होय आणि वेद म्हणणाऱ्यांमध्ये सुद्धा वेदांचा अर्थ जाणणारा श्रेष्ठ आहे. (३१)

अर्थज्ञात्सं(म्)शयच्छेत्ता, ततः(श्) श्रेयान् स्वकर्मकृत् ।

मुक्तसङ्गस्ततो भूया- नदोग्धा धर्ममात्मनः ॥ 32॥

अर्थ जाणणाऱ्यांपेक्षा संशयनिवृत्ती करणारा श्रेष्ठ होय. त्यापेक्षा वर्णाश्रमानुसार कर्म करणारा श्रेष्ठ होय. त्याच्यापेक्षा आस सोडून आपल्या धर्माचे निष्काम भावाने आचरण करणारा अधिक श्रेष्ठ आहे. (३२)

तस्मान्मय्यर्पिताशेष-क्रियार्थात्मा निरन्तरः ।

मय्यर्पितात्मनः(फ्) पुं(म्)सो, मयि सन्न्यस्तकर्मणः ।

न पश्यामि परं(म्) भूत-मकर्तुः(स्) समदर्शनात् ॥ 33॥

त्याच्याहीपेक्षा जो आपली सर्व कर्मे, त्यांची फळे तसेच आपले शरीरही मला अर्पण करून आत्मापरमात्म्यात भेद न मानता माझी उपासना करतो तो श्रेष्ठ आहे. अशा कर्तेपण सोडणाऱ्या समदर्शी पुरुषापेक्षा मला दुसरा कोणी श्रेष्ठ मनुष्य दिसत नाही. (३३)

मनसैतानि भूतानि, प्रणमेद्बहुमानयन् ।

ईश्वरो जीवकलया, प्रविष्टो भगवानिति ॥ 34॥

म्हणून जीवरूप आपल्या अंशाने साक्षात भगवंतच सर्वांमध्ये राहात आहेत, असे मानून सर्व प्राण्यांना मोठ्या आदराने मनाने नमस्कार करावा. (३४)

भक्तियोगश्च योगश्च, मया मानव्युदीरितः ।

ययोरेकतरेणैव, पुरुषः(फ्) पुरुषं(वँ) व्रजेत् ॥ 35॥

हे माते, मी तुला असा हा भक्तियोग आणि अष्टांगयोग सांगितला. यांपैकी एक योग करण्यानेही जीव भगवंतांना प्राप्त होऊ शकतो. (३५)

एतद्भगवतो रूपं(म्), ब्रह्मणः(फ्) परमात्मनः ।

परं(म्) प्रधानं(म्) पुरुषं(न्), दैवं(ङ्) कर्मविचेष्टितम् ॥ 36॥

रूपभेदास्पदं(न्) दिव्यं(ङ्), काल इत्यभिधीयते ।

भूतानां(म्) महदादीनां(यँ), यतो भिन्नदृशां(म्) भयम् ॥ 37॥

भगवान परमात्मा परब्रह्माचा अद्भुत प्रभावमंत्र, तसेच जगातील पदार्थांच्या नानाविध वैचित्र्याला कारण असणारा स्वरूपविशेषच 'काल' या नावाने प्रसिद्ध आहे. प्रकृती आणि पुरुष याचीच रूपे आहेत. तसेच ही त्याच्यापासून वेगळी सुद्धा आहेत. नाना प्रकारच्या कर्मांचे मूळ अदृष्ट तो हाच होय आणि याच्यापासून महत्तत्त्वादींच्या अभिमानी भेददर्शी प्राण्यांना नेहमी भय असते. (३६-३७)

योऽन्तः(फ्)प्रविश्य भूतानि, भूतैरत्त्यखिलाश्रयः ।

स विष्णवाख्योऽधियज्ञोऽसौ, कालः(ख्) कलयतां(म्) प्रभुः ॥ 38॥

जो सर्वांचा आश्रय असलयाकारणाने सर्व प्राण्यांमध्ये प्रविष्ट होऊन भूतांच्या द्वारेच त्यांचा संहार करतो, तो जग चालविणाऱ्या ब्रह्मदेवादिकांचाही प्रभू भगवान कालच यज्ञांचे फळ देणारा विष्णू होय. (३८)

न चास्य कश्चिद्दयितो, न द्वेष्यो न च बान्धवः ।

आविशत्यप्रमत्तोऽसौ, प्रमत्तं(ञ्) जनमन्तकृत् ॥ 39॥

हा काल कोणाचा मित्र नाही, कोणाचा शत्रू नाही आणि कोणाचा सगासोयराही नाही. हा नेहमी सावध राहातो आणि आपल्या स्वरूपभूत अशा श्रीभगवंतांचे विस्मरण होऊन भोगरूपी प्रमादात पडलेल्या प्राण्यांवर आक्रमण करून त्यांचा संहार करतो. (३९)

यद्भयाद्वाति वातोऽयं(म्), सूर्यस्तपति यद्भयात् ।

यद्भयाद्वर्षते देवो, भगणो भाति यद्भयात् ॥ 40॥

याच्या भीतीनेच वारा वाहातो. याच्या भयानेच सूर्य तापतो, याच्या भयाने इंद्र वर्षाव करतो आणि याच्याच भयाने तारे चमकतात. (४०)

यद्वनस्पतयो भीता, लताश्चौषधिभिः(स्) सह ।

स्वे स्वे कालेऽभिगृह्णन्ति, पुष्पाणि च फलानि च ॥ 41॥

याच्या भयानेच वनस्पती वेली इत्यादी योग्य वेळी फुले-फळे धारण करतात. (४१)

स्रवन्ति सरितो भीता, नोत्सर्पत्युदधिर्यतः ।

अग्निरिन्धे सगिरिभिर्-भूर्न मज्जति यद्भयात् ॥ 42॥

याच्याच भीतीने नद्या वाहातात आणि समुद्र किनाऱ्याच्या बाहेर जात नाहीत. याच्या भयाने अग्नी प्रज्वलित होतो आणि पर्वतांसह पृथ्वी पाण्यात बुडत नाही. (४२)

**नभो ददाति श्वसतां(म्), पदं(यँ) यन्नियमाददः ।**

**लोकं(म्) स्वदेहं(न्) तनुते, महान् सप्तभिरावृतम् ॥ 43॥**

**याच्या आज्ञेनेच आकाश जिवंत प्राण्यांना अवकाश देते आणि महत्तत्त्व अहंकाररूप शरीराचा सात आवरणांनी युक्त अशा ब्रह्मांडाच्या रूपाने विस्तार करते. (४३)**

**गुणाभिमानिनो देवाः(स्), सर्गादिष्वस्य यद्भयात् ।**

**वर्तन्तेऽनुयुगं(यँ) येषां(वँ), वश एतच्चराचरम् ॥ 44॥**

**या कालाच्याच भयाने सत्त्वादी गुणांचे अभिमानी विष्णू आदी देव ज्यांच्या अधीन हे सर्व चराचर जग आहे, आपल्या जगत रचना इत्यादी कार्यांत युगक्रमानुसार तत्पर असतात. (४४)**

**सोऽनन्तोऽन्तकरः(ख्) कालोऽ-नादिरादिकृदव्ययः ।**

**जनं(ञ्) जनेन जनयन्, मारयन् मृत्युनान्तकम् ॥ 45॥**

**अविनाशी काल स्वतः अनादी, परंतु दुसऱ्यांना उत्पन्न करणारा आहे. तसेच स्वतः अनंत असूनही दुसऱ्यांचा अंत करणारा आहे. हा पित्यापासून पुत्राची उत्पत्ती करीत सर्व जगाची निर्मिती करतो आणि आपली संहारशक्ती जो मृत्यू त्याच्याकडून यमराजाला सुद्धा मारून त्याचा अंत करतो. (४५)**

**इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)**

**तृतीयस्कन्धे कापिलेयोपाख्याने एकोनत्रिं(म्)शोऽध्यायः ॥**

**ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

**ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥**